रेग्युलर दिवाणी दावा क्र.११२/२०२१
नि.क्र.२५/ क (सोबत)

वादीतर्फे साक्षीदार क्र.२

**उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री. के.व्ही. पंढरीकर यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

१. हे म्हणणे खरे आहे की, माझे वय ७२ असून मी गेल्या ५० वर्षापासून बऱ्याच प्रकरणामध्ये कोर्ट कामासंदर्भात पक्षकारांना मदत केलेली आहे. मी ९वी पास आहे. माझे शपथपत्र मी वाचून पाहिले आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. माझ्या शपथपत्रातील परिच्छेद क्र.२ मधील रेखांकित भाग अ मधील मजकूर बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही शासनाच्या मालकी व ताब्यातील जमीन आहे. वादी राजेंद्रला तीन बहिणी असून त्या हयात आहेत. वादीची आई भारतबाई ही वादीचे वडील किसनची दुसरी पत्नी आहे. किसनच्या पहिल्या पत्नीचे नाव मला आठवत नाही, परंतु त्यांना एक मुलगी नामे चतुराबाई आहे. चतुराबाई हिला वादीच्या सख्ख्या मामाला दिले आहे. राजेंद्रचे वडील किसन माझ्यासोबत राहत होते व माझे बैल घेऊन ते जमीन कास्त करत होते. हे म्हणणे खरे आहे की, राजेंद्रचे वडील किसन हे माझे मित्र आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादीचे वडील माझे मित्र असल्यामुळे व माझी जमीन कास्त करत असल्यामुळे अधोरेखांकित भाग अ मधील मजकूर वगळून खोटे शपथपत्र दाखल केले आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2025.09.10 17:10:50 +0530

दि.१०/०९/२०२५

(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, निलंगा.